# मलेरिया आणि डेंग्यूविरोधात मोठ्या प्रमाणावर जनजागृती अभियान राबवा

## ■ आमदार संदीप नाईक यांची पालिका प्रशासनाला सूचना

नवी मुंबई । प्रतिनिधी

नवी मुंबई शहरामध्ये साथीचे रुग्ण आढळत आहेत. या रोगांपासून शहराला मुक्त करण्यासाठी डेंग्यू, मलेरियासारख्या साथीच्या आजारांविरोधात शहरभर मोठया प्रमाणावर जनजागृती अभियान राबवा, अशी सूचना आमदार संदीप नाईक यांनी महापालिका प्रशासनाला केली आहे. साथीच्या आजारांवरील प्रतिबंधात्मक उपचार करण्यात कामचुकारपणा करणारे पालिकेचे कर्मचारी आणि अधिकाऱ्यांवर सक्त कारवाई करा. जे ठेकेदार साफसफाईच्या कामात हलगर्जीपणा करत असतील त्यांच्यावरही कारवाई करण्याचे निर्देश त्यांनी दिले आहेत.

ऐरोली मतदारसंघाचे आमदार म्हणून दुसऱ्यांदा पदाची शपथ घेतल्यानंतर शहरातील आरोग्याचा प्रश्न गंभीर वाटल्याने आज सकाळी आमदार संदीप नाईक यांनी तातडीने पालिकेचे आयुक्त आबासाहेब जऱ्हाड यांची बैठक घेतली. या बैठकीत त्यांनी शहरातील साथीच्या रोगांचा आढावा घेतला. तसेच या रोगांवर प्रभावी नियंत्रण आणण्यासाठी अत्यंत महत्त्वाच्या अशा सूचना केल्या.



साथीच्या आजारांवर नियंत्रण मिळविण्यासाठी सूचनांचे निवेदन महापालिका आयुक्त आबासाहेब जऱ्हाड यांना देताना आमदार संदीप नाईक, सोबत इतर मान्यवर.

**आमदार संदीप नाईक यांनी केलेल्या महत्त्वपूर्ण सूचना...**

- कामचुकार कर्मचारी, अधिकारी, ठेकेदारांवर कारवाई करा
- रुग्णांची आर्थिक लूट करणाऱ्या खाजगी रुग्णालयांवर कारवाई करा
- स्वच्छतेसाठी कंडोमिनियम अंतर्गत पेव्हरब्लॉकची कामे सुरु करा
- ठेक्यात नमूद केल्याप्रमाणे स्टॉर्म वॉटर ड्रेनेज आणि छोटया नाल्यांची सफाई वर्षातून तीन वेळा करा
- ऐरोली आणि नेरुळ येथील माता बाल रुग्णालयांच्या कामांना गती द्या

शहरातील नोड, गावठाण, झोपडपटटी अशा सर्वच भागात पालिकेने जनजागृतीपर अभियान मोठया प्रमाणावर राबवून साथीच्या आजारांची, त्यांच्या लक्षणांची आणि उपचारांची माहिती नागरिकांना द्यावी. त्यासाठी होर्डिंग, पोस्टर्स, भित्तीचित्रे, माहितीपत्रके प्रसिध्द करावीत, अशा सूचना आमदार नाईक यांनी दिल्या. धूर फवारणीसाठी मशिन्सची संख्या वाढवा. अलिकडेच झालेल्या वादळात जी झाडे धाराशाही झाली होती. अशी झाडे अंतर्गत भागात आणि ठाणे-बेलापूर मार्गावर पडून आहेत. या झाडांची छाटणी केलेली नाही. ती छाटणी करुन ही झाडे स्वच्छ करावीत. कंडोमिनीयम अंतर्गत झालेल्या सिव्हरेज, पेव्हरब्लॉक आणि इतर नागरी सुविधांच्या कामांमुळे जर पाणी साचत असेल तर ते पाणी काढून टाकावे जेणेकरुन डासांच्या आळया तयार होणार नाहीत. तसेच विभाग स्वच्छ आणि सुंदर राहण्यासाठी पेव्हरब्लॉकची कामे हाती घ्यावीत. शहरातील डेब्रीज तात्काळ उचला. साथ रोगांवरील प्रभावी प्रतिबंधात्मक उपचारांसाठी कर्मचाऱ्यांची संख्या वाढवा. ड्रेनेज आणि अंतर्गत नाल्यांची सफाई करा. (पान ३ ▸▸

### 'ग्रीन होप'तर्फे 'सशक्त नवी मुंबई' अभियान...

नवी मुंबईला साथीच्या आजारांपासून मुक्त करण्यासाठी तसेच शहरात आरोग्यपूर्ण वातावरण निर्माण करण्यासाठी लोकनेते गणेश नाईक यांच्या प्रेरणेने स्थापन झालेल्या ग्रीन होप या स्वयंसेवी संस्थेच्या माध्यमातून सशक्त नवी मुंबई अभियान राबविण्यात येणार असल्याची माहिती आमदार संदीप नाईक यांनी प्रसिध्दी माध्यमांना दिली. या अंतर्गत नोव्हेंबर महिना संपेपर्यत नगरसेवक, सामाजिक संस्थांच्या सहकार्याने स्वच्छता अभियान, आरोग्य शिबिरे, जनजागृतीपर कार्यक्रम घेतले जाणार आहेत.